

# श्रावणमास महात्म्य

- जगद्गुरु रामानंदाचार्य नरेंद्राचार्यजी महाराज

आपल्या संस्कृतीत भक्तीला अनन्य साधारण महत्त्व आहे. "श्रवणं किर्तनं स्मरणं पादसेवनं अर्चनं वंदनं दास्यं सख्यं आत्मनिवेदनम्।" अशा नवविधा भक्तीचे प्रकार सांगितले आहेत. यात पहिली भक्ती "श्रवण" होय. श्रवण म्हणजे ऐकणे. श्रवणा पासूनच श्रावण समजू शकतो. श्रावणमास ऐकण्याचा मास आहे. स्त्रवत म्हणजे निर्मिती होत रहाणे. श्रावण महिन्यात पावसाच्या सरी नित्य स्त्रवत असतात. श्रवण म्हणजे श्रावण. म्हणुनच श्रावण मासात घरोघरी नवनाथ, रामविजस, हरिविजय, शिवलिलामृत अशा सद्ग्रंथांचे श्रवण केले जाते. ग्रामीण भोषेत "पोथी लावणे" हा शब्द याच सेवेबद्दल वापरला जातो. ज्याला अध्यात्म उन्नती साधायची आहे त्याने कायम सत्संग केला पाहिजे. सत्संगातून उत्तम विचारांचे श्रवण केले पाहिजे. उत्तम श्रवण अंतःकरणात रुजण्याचा काळ श्रावण होय. श्रावणात श्रावणसरी अखंड स्त्रवत असतात. योगाभ्यासात या अशा वातावरणाचे विशेष महत्त्व सांगितले आहे. योगी लोक अखंड स्त्रवणाऱ्या श्रावणधारावर लक्ष केंद्रित करुन योग साधतात. श्रावणधारा स्त्रवण्याचा काळ मनाला प्रफुल्लीत आणि मन एकाग्र होण्यास अत्यंत महत्त्वाचा मानला जातो. पाश्चिमात्य साधक कृत्रिमरित्या श्रावणातले असे अखंड स्त्रवणाऱ्या श्रावण सरींचे वातावरण निर्माण करतात व त्या योगे योग साधना करतात. असे ऐकीवात आहे. अशा पध्दतीने श्रवणद्वारा आत्मोन्नतीचा काळ म्हणून श्रावणाचे महत्त्व आहे.

"शं करोति शंकरः" जो सर्वाचे शं म्हणजेच कल्याण करतो तो शंकर होय. शंकर हा स्मशानात रहाणारा, अंगभर भस्म धारण करणारा, सर्प-व्याघ्र अशा भयंकर प्राण्यांच्या सहवासात रहाणारा, भूत प्रेताच्या घोळक्यात स्वतःला हरवून घेणारा महान वैराग्य संपन्न योगी म्हणून प्रसिध्द असला तरी सुध्दा एवढीच त्याची ओळख नसून शिवशंकर हा गृहस्थाश्रमीयांचा आदर्श आहे. उत्तम नेता म्हणून देखील त्याची विशेष अशी ओळख आहे. शिव हा एकटा भासत असला तरी तो एकटा नाही हे लक्षात घेतले पाहिजे. शिव हा कायम शक्तीने युक्त असतो. शिव या शब्दातून "ई" कार रुपी शक्ती बाजूला काढली तर "शिव" हे अक्षर शिल्लक रहाते. शव याचा अर्थ प्रेत. ज्याला कोणीही अधिक काळ घरात ठेवत नाही ते प्रेत. म्हणजेच शिव हा शक्तीने युक्त असेल तरच तो शिव म्हणजे मंगलकारी आणि शक्ती विरहीत असेल तर तो शव म्हणजे अकल्याणकारी होय. पती पत्नीची अशी एकरुपता आपल्याला दुसरीकडे पहायला मिळणे कठीण आहे. संसार कसा करावा याचा आदर्श शंकर होय. शंकर रहातो कुठे? तर स्मशानात. स्मशानात रहायला घरभाडे लागत नाही किंवा त्या जागेवर कोणी अतिक्रमणही करीत नाही. घरात विद्युत उपकरणांची आवश्यकता असते. त्याच्यासाठी मिटर आल, महिन्याच बील आले, शंकराने आपल्या कपाळी चंद्र

धारण केलेला आहे. त्यामुळे प्रकाशच प्रकाश आहे. याचं बील देखील भरावं लागत नाही. घर म्हटले की शुध्द पाण्याची २४ तास व्यवस्था असली पाहिजे. त्यालाही पैसा आलाच. शिवाने आपल्या डोक्यावर गंगेलाच धारण केले आहे. शिवाच्या संसारात पाणी टंचाईचा प्रश्नच येत नाही. ग्लोबल वॉर्मिंगमुळे उष्णतेचा तडाखा आपल्याला सहन होत नाही. एअर कंडिशन शिवाय रहाणे दुरापास्त होवून बसले आहे. शिव शंकर कैलास पर्वतावर रहात असल्याने एवढी शितलता असते की ए.सी. लावण्याचा प्रश्नच येत नाही. कुटुंब म्हटले की वाहन हवेच. पेट्रोल, डिझेलचे गगनाला भिडणाने भाव पहाता वाहन वापरणे अवघड होवून बसले आहे. पण हा शंकर बघा याचे वाहन बैल. ना इंधनाचा खर्च ना सर्व्हीसिंग. घर म्हटलं चोर दरोडेखोरांचा उपद्रव अटळ असतो. परंतु असा त्रास शिवाला बिलकुल नाही. त्याच्या भोवतीकडे असते भूत-प्रेत पिशाच्यांचे. अशा पध्दतीने अत्यंत कमी खर्चात आदर्शवत संसार करणारा देव म्हणून शिवशंकरा शिवाय दुसरा कोण बरं असु शकेल? शंकरा जवळ संपत्ती नाही असा विचार केला तर तो देखील चुकीचा आहे. कारण धनाध्यक्ष कुबेर हा शिवाचा जिवलग सखा आहे.

शिव शंकर जसा गृहस्थाश्रमीयांचा आदर्श आहे तसाच तो आजच्या नेत्यांनी आदर्श घ्यावा असा देखील आहे. नेता तोच जो प्रसंगी सेनेच्याही पुढे जावून सेनेवर आलेले संकट स्वतः झेलतो. समुद्र मंथनातून जेव्हा अमृत निघाले तेव्हा ते स्विकारण्याकरीता सर्व देवता पुढे आल्या मात्र जेव्हा समुद्र मंथनातून हलाहल विष निघाले तेव्हा ते स्विकारण्याकरीता कोणीही पुढे येईना. कारण ते वीष पचविणे सगळ्यांच्या शक्ती बाहेरचे होते. देव सेनेवर आलेले संकट ओळखून भोलेनाथ महादेव पुढे आले आणि त्यांनी ते वीष आपल्या कंठामध्ये सामावून देव सेनेचे रक्षण केले. एकाच विचारांने प्रेरित असणाऱ्या समाजाचे नेतृत्व करणे सोपे असते. परंतु विषमता सांभाळणे फार अवघड असते. शिव शंकराकडे बघा शिवाची पत्नी पार्वती. तिचे वाहन सिंह आणि शिवाचे वाहन नंदी. दोघेही एकमेकांचे कट्टर शत्रू. मात्र शिव चरणी नंदी आणि सिंह आनंदाने एकत्र नांदतात. शिवाचा पुत्र गणेश. त्याचे वाहन उंदीर. शिवाच्या गळ्यात साप आणि कार्तिकेयाचे वाहन मोर. मोर आणि साप याचे वैर काय सांगावे? मात्र ते देखील शिव चरणाशी आनंदाने एकत्र नांदतात. ज्या राज्याचा अधिपती शिवासारखा असेल तेच राज्य आदर्श होवू शकते. अन्यथा आजचे राजकारण आपण बघतो. सत्तेसाठी विषम विचारांची माणसे देखील एकत्र येतात पण राज्यकारभार करु शकत नाहीत. सरकार कधी कोसळेल सांगताच येत नाही.

असा हा शिवशंकर आपल्या जवळ काही न ठेवता आपल्या भक्तांना जे पाहिजे ते देणारा महान दानशूर आहे. म्हणून त्याला ''अवघड दानी'' असे म्हणतात. देताना तो कोण आहे याचा जरासुध्दा विचार शिवशंकर करीत नाहीत. पहातो त्याची फक्त दृढभक्ती. रावणाला आत्मलिंग देताना शिवाने जरासुध्दा विचार केला नाही. शिवाला अत्यंत प्रिय असणारा असा श्रावण मास आहे. या श्रावण मासात नित्य शिवपूजन, श्रावणी सोमवार, शिवामुठ व्रत, श्रावणी शनिवार, आदित्य व्रत, मंगळागौरी व्रत, शाकदान - दधीव्रत, वरदलक्ष्मी व्रत, कृष्ण जन्माष्टमी व्रत, मौन व्रत, शितला सप्तमी, गोपाळकाला, सत्यनारायण अशी अनेक प्रकारची व्रते तर नागपंचमी, रक्षाबंधन, श्रावणी, बैलपोळा असे धार्मिक सण आणि बहुतांशी स्वातंत्र्य दिना सारखा राष्ट्रीय सणही संपन्न केला जातो. या सण व्रतांची आपण थोडक्यात माहिती करुन घेवूया.

शिव उपासना : ''जलधारा शिवप्रियः।'' या न्यायाने संपूर्ण श्रावण मास शिव अभिषेक करावा. कारण शंकराला सर्वात आवडती वस्तु जल आहे. शिव मंदिरात पिंडीवर अखंड जलधारा (गळती) ठेवली जाते. शिव पूजनात बेलाचे विशेष महत्त्व आहे. त्रिजन्मपाप संहाराचे सामर्थ्य एक बेल पत्र समर्पण करण्यात सांगितले आहे. शिव उपासनेत 'चिंतामणी पार्थिवेश्वर पूजनाचे'' एक वेगळे महत्त्व आहे. नित्य मातीची शिवलिंग तयार करावीत. त्यांचे पूजन करुन विसर्जन करावे. अशी ही पुराण प्रसिध्द शिव उपासना आहे. लंकापती रावणाची आई देखील असे हे पार्थिव शिवप्रत करीत असे. ते पाहून रावणाने या मातीच्या शिवलिंगाची काय पूजा करतेस तुला प्रत्यक्ष कैलास पर्वत तुझ्या समोर आणून देतो. प्रत्यक्ष शिवपूजा कर असा सल्ला दिला. कठोर तपस्या करुन रावणाने शिवाला प्रसन्न करुन घेतले. शिवाने कसलाही विशेष विचार न करता कैलासच काय माझे आत्मलिंग प्रदान करतो असा वर दिला. सारे देवगण भयभीत झाले. रावण मात्र अत्यानंदाने शिवआत्मलिंग घेवून जावू लागला. साऱ्या देवतांनी हे विघ्न टाळण्यासाठी गणेशाला साकडं घातलं. गणेशाने बटुचे रुप घेवून रावणाला विश्वासात घेतले आणि सर्व देवांना साक्षी ठेवून ते शिव आत्मलिंग आपल्या हाती घेतले आणि भूमीवर ठेवले. ते महाक्षेत्र गोकर्ण महाबळेश्वर होय. असे महाक्षेत्र निर्माण होण्याला चिंतामणी पार्थिवेश्वर शिव उपासनाच कारणीभूत ठरली आहे.

**श्रावणी सोमवार** : श्रावण महिन्यातील सोमवाराला विशेष महत्त्व आहे. या दिवशी शिवाची उपासना अधिक फलदायी असते. प्रत्येक सोमवारी शिवामुठ वाहण्याचे व्रत केले जाते. शिवपूजन करुन क्रमशः तांदुळ, तीळ, मुग, जवस व सातुक एक एक मुठी शिवाला अर्पण केले जाते.

**श्रावणी शनीवार** : श्रावण महिन्यातील शिव व्रतात सोमवारप्रमाणेच शनिवारालाही विशेष महत्त्व आहे. या दिवशी शिव उपासने बरोबर नरसिंह, पिंपळ, मारुती व शनी देवाच्या पूजनाचे देखील विशेष महत्त्व आहे. म्हणून भाविक श्रावण

महिन्यात सोमवारप्रमाणेच शनिवारी देखील व्रत उपवास करतात.

**आदित्य व्रत :** या व्रतात सूर्याची उपासना केली जाते. हे व्रत श्रावण ते माघ असे ६ महिन्याचे आहे. प्रत्येक रविवारी सूर्योदया आधि उठून स्नानादी नित्य कर्म करुन मौनाने सूर्याची उपासना केली जाते. ६ महिने शक्य नसेल तर किमान श्रावण महिन्यात जेवढे रविवार येतील त्यादिवशी सूर्याची उपासना करावी. माघ शुध्द ७ म्हणजेच रथसप्तमीस या व्रताचे उद्यापन करावे.

**मंगळागौरी व्रत :** स्त्रियांना अखंड सौभाग्य, पुत्र संपदा लाभावी याकरिता हे व्रत करतात. स्त्रिया विवाहानंतर या व्रतास प्रारंभ करतात. हे व्रत सातत्याने ५ वर्ष केले जाते. त्यानंतर या व्रताचे उद्यापन केले जाते. या व्रतात शिव पार्वतीची उपासना केली जाते. रात्री जागरण केले जाते.

**शाक दान दधीव्रत :** चातुर्मासात घेतलेल्या शाक (भाजी) व्रताची सांगता आणि दहीव्रताची सुरुवात श्रावण शुध्द १२ ला केली जाते.

**वरदलक्ष्मी व्रत :** या व्रतामध्ये महालक्ष्मीची आरधना केली जाते. श्रावण पौणिमेच्या अगोदर येणाऱ्या शुक्रवारी हे व्रत केले जाते. या व्रत प्रभावाने अलक्ष्मीचा नाश होवून दशविध सुलक्ष्मीची प्राप्ती होते.

**नागपंचमी :** श्रावण शुध्द पंचमीला नागपंचमी म्हणतात. यादिवशी भिंतीवर काढलेल्या नागांची किंवा कुलाचाराप्रमाणे नाग देवतेची पूजा करतात. नाग देवता ही धनाची रक्षक आहे. नाग देवतेला लाह्या, दुधाचा नैवेद्य दाखवून संपत्तीच्या रक्षणाची प्रार्थना केली जाते.

**श्रावणी :** चारी वर्णांकरीता काही विशेष सण सांगितले आहेत ते असे, ब्राह्मणास – श्रावणी, क्षत्रियास – दसरा, (शस्त्रपूजन), वैश्यास – दिवाळी (वही पूजन) आणि शुद्रांना – होळी. श्रावणी ही ब्राह्मणांची विद्या सतेज रहण्याकरीता आणि दान प्रतिग्रहामुळे प्राप्त झालेले मालीन्य दूर होण्याकरीता संपन्न केली जाते. आज दसरा, दिवाळी, होळी मोठ्या उत्साहात साजरी केली जाते. मात्र ब्राह्मण वर्गाला श्रावणीचा विसर पडलेला दिसतो आहे. केवळ पूजन अर्चनाचा व्यवसाय करणाऱ्या ब्राह्मणांसाठीच ही श्रावणी आहे असा गैरसमज आज पहावयास मिळतो. खरं पाहीलं तर वेदाध्ययन करणे आणि त्या ज्ञानाच्या सहाय्याने समाजाला मार्गदर्शन करणे हे ब्राह्मणांचे प्रमुख कर्तव्य आहे. त्या पासून विन्मुख झालेल्या ब्राह्मणांना देखील श्रावणीची नितांत आवश्यकता आहे. श्रावणीद्वारा वर्षभर होणाऱ्या पातकांपासून मुक्ती मिळते. अशी ही श्रावणी श्रावण शुध्द ५, श्रावणी पौर्णिमा, भाद्रपद शुध्द १२ किंवा भाद्रपद शुध्द १५ या मुहूर्तावर केली जाते.

**रक्षाबंधन :** श्रावण शुध्द पौर्णिमेला श्रावणी पौर्णिमा, रक्षाबंधन, राखी पौर्णिमा किंवा नारळी पौर्णिमा असे म्हणतात. कोकणात यादिवशी समुद्राची पूजा करुन समुद्राला नारळ अर्पण करण्याची परंपरा आहे. मच्छीमारीसाठी जाणाऱ्या आपल्या धन्याच्या रक्षणासाठी प्रार्थना केली जाते. भावाने बहीणीचे रक्षण करावे म्हणून बहीण भावाच्या उजव्या हातात रक्षा (राखी) बांधते. या दिवशी घरोघरी कुलधर्म कुलाचाार संपन्न केला जातो.

**श्रीकृष्ण जन्माष्टमी :–** ''परित्राणाय साधूनां विनाशायच दुष्कृताम्। धर्मसंस्थापनार्थाय संभवामि युगे युगे ।।'' अशी ग्वाही देणाऱ्या महाविष्णुने विशेष असे दशावतार धारण केले आहेत. यात राम आणि कृष्ण अधिक लोकप्रिय आहेत. प्रभु रामचंद्रांचा जन्म चैत्र शुध्द ९ माध्यान्हकाळी तर गोपाळकृष्णांचा जन्म श्रावण कृष्ण ८ मध्यरात्री झाला आहे. अधर्मावर घाला घालणारा महाकाळ उदयास आला म्हणून गोपाळ कृष्णास ''काळा'' असेही संबोधले जाते. संसारातील आचार पालन शिकवावा प्रभुरामचंद्रांनी आणि राष्ट्रधर्म शिकवावा श्रीकृष्णाकडून. अशा धर्मावतार भगवान गोपाळकृष्णांचा जन्मोत्सव म्हणजेच श्रीकृष्ण जन्माष्टमी होय. जन्मोत्सवाचे दुसरे दिवशी श्रीकृष्णाच्या बाल लिलांची आठवण म्हणून ''दही हंडी'', ''गोपाळकाला'' केला जातो.

**पोळा :** कृषी प्रधान असणाऱ्या भारत वर्षात शेती उपयोगी महत्त्वाचा प्राणी बैल होय. अविरत श्रम करणाऱ्या या नंदीबैला प्रती कृतज्ञता व्यक्त करण्याचा, त्याच्या मानेवर ''जू'' न ठेवता त्याचा सन्मान करण्याचा, त्याला गोड धोड खावू घालण्याचा विशेष दिवस म्हणजे बैलपोळा होय. नंदीबैल हा केवळ राबणारा प्राणी नसून तो साक्षात धर्म आहे. अशा धर्म पूजनाचा दिवस म्हणजे बैलपोळा होय. गोमातेच्या गात्रा गात्रात सर्व देव देवता निवास करतात. म्हणून गोमाता पूजनीय तर नदीबैल हा साक्षात धर्म होय. धर्माने कठोर तपाचरण करुन शिव शंकराला प्रसन्न करुन घेतलं आणि माझा स्विकार करा अशी विनंती केली. शिव शंकराने प्रसन्न होवून धर्माला आपलं वाहन बनविल ते वाहन म्हणजे नंदीबैल. त्या धर्मस्वरुप नंदीबैलाच्या प्रती कृतज्ञता व्यक्त करण्याचा दिवस म्हणजे बैलपोळा होय.

याशिवाय बहुतेक करुन १५ ऑगस्ट हा स्वातंत्र्य दिन देखील श्रावणात येतो. तो तारखेने असल्यामुळे पुढे मागे होवू शकतो. भारताला स्वातंत्र्य मिळवून देणाऱ्या हुतात्म्यांच्या आणि स्वतंत्र भारताच्या विजयाचा दिवस म्हणून संपूर्ण भारत वासीयांना हा दिवस इतर सणांहूनही अधिक प्रिय वाटतो.

अशा विविधतेने नटलेल्या श्रावण मासाचा आनंद सर्वांनी अनुभवावा म्हणजे मनाला अल्हाद प्राप्त होईल आणि नकळत पुण्यांशाचा साठा आपल्या धर्मखात्यात जमा होईल.

***